म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक ज. मो. गोरगांवकर

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव सच्चदेशभक्त

(ANOVEL).

हें पुस्तक

जनार्दन मोरोबा पाटील गोरगांवकर

यांनी रचून तयार केलें.

तें

मुंबई येथें

# सत्यदर्शक हिरा.

( कल्पित गोष्ट )

TRUTH GUIDER DIAMOND

( A NOVEL )

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणें सन १८

हें पुस्तक

जनार्दन मोरोबा पाटील गोरेगांवकर

यांनीं रचून तयार केलें

तें

मुंबई येथें

देव्हारें प्रिंटिंग प्रेस मध्यें छापिलें.

इसवी सन १८८८

शके १८१०

(सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत).

किंमत ४ आणे.

हें

लहानसें

कृत्य माझे परम

प्रिय गांवदेवी एथील तरूण

मित्र मंडळ ("गांवदेवी जुव्हेनाईल

क्लब") यांस मोठ्या लिनितेनें

व अत्यादरें स्नेह भाव

दर्शक नजर केलें

असे.

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

आतांच्या काळांतील विद्याविभूषित जनसमूहांत मज सारख्या अल्पमति ग्रंथकारानें केलेलें एकादें कृत्य तदभिरुच्यनुसार न होऊन उपहासास मात्र कारणीभूत होणार हें मी जाणत आहें. तरी जें मीं मागें केलें तें पुनः एकवेळ करण्याची मला जेव्हां उत्कट इच्छा झाली तेव्हां हें मीं सर्व विसरलों, आणि हातांत लेखणी घेऊन एकदांची कल्पना खरडून काढिली. आतां एद्विषयीं विद्वानांच्या मुखांतून जो उपहास हाच माझा गौरव, एऱ्हवीं मी अविद्वानानें कोणत्या गौरवाची आशा करावी?

असो. या पुस्तकांत कांहीं गुण दिसून आलेच तर तद्विषयींचा वांटा माझ्या विद्वान मित्रांचा आहे. मी मात्र दोषाचा वांटेकरी आहें सबब दोषांची मला क्षमा असावी.

रा० रा० **रामचंद्र आवाजी देशाई** यानीं मी प्रथमच लिहून काढिलेला खरडा एका दिवसांत साद्यंत वाचून उत्तेजनपर मला पत्र लिहिलें तद्विषयीं मी त्यांचा आभारी आहें.

**ग्रंथकर्ता.**

---

हे पुस्तक विठ्ठल गोविंद केळकर
यांनी मराठी ग्रंथ संग्रहाल-
यास भेट केले आहे

श्री

# सत्यदर्शक हिरा.

( कल्पित गोष्ट. )

जगद्गुरवेनमः

कांहीं वर्षां पूर्वी होळकराच्या दरबारांत कोणी एका सावकारानें एक मौल्यवान हिरा विकावयास आणिला होता; तो जेव्हां सरकार स्वारीच्या हातीं आला तेव्हां, जो हिरा आपण कांहीं वर्षां पूर्वी एका नामांकीत जोशास देऊन त्याची संभावना केली होती तोच हा; असी राजाची पक्की खात्री झाल्यावर, तो ह्या सावकाराच्या हातीं कसा आला, तो जोशी हल्लीं कोठें व कोणत्या स्थितींत आहे, ह्याचा खुलासेवार पत्ता काढण्याविषयीं राजास उत्कंठ इच्छा उत्पन्न होऊन त्यानें त्या सावकारास तद्विषयीं विचारिलें. तेव्हां एकानें दुसऱ्याकडून, दुसऱ्यानें तिसऱ्याकडून, तिसऱ्यानें चौथ्यापासून असे खरेदी करणाराचे वर्गक्रम होतां होतां शेवटीं त्यांच्याच राज्यांत जोतिबाशेट नांवाचा एक सधन सोनार रहात होता त्याजवर येऊन ठेपलें; मग जोति-

थाम दरबारीं बोलावून राजानें चौकशीस आरंभ केला.

**राजा.**—जोतिबा, तुह्मीं कांहीं वर्षां पूर्वीं ह्या इसमास हिरा विकला होता काय?

**जोतिबा**—(भयचकित होता) होय महाराज एक हिरा मी विकला होता.

**राजा.**—(हिरा दाखऊन) तो हाच काय?

**जो०**—होय होय, हाच. तो मी ह्याला तीन हजारास का पांच हजारास विकला.

**रा०**—तुह्मी दहा हजारास कां विकाना? तुह्मी मालकच होतां. पण जोतिबा, हा तुह्मी कधीं व कोणापासून घेतला हें मला मुद्देसूद सांगाल?

**जो०**—(थोडासा गांगरून) जी महाराज, हा कोंनाहीं मी विकत घेतला—मग न जाणों—क्षमा असावी. आणि घेतला तो येथेंच घेतला. आज दोन वर्षे झालीं असावी. इतक्या दिवसांत मला कांहीं समजतें तर मी तो परत आणून देतों; आणि घेतला तो पंधराशांत का सतराशांत; कारण त्या वेळीं मला त्याची किंमत बरोबर कळली नव्हती; व विकणारानें सुद्धां त्याचे फक्त दोन हजार मागितले होते असें मला आठवतें; आतां मीं तुमचें लेकरूं आहें अज्ञांधास पदरांत घ्यावें दुसरें काय.

**राजा.**—येथेंच घेतला ह्मणुन सांगता हें कसें? येथें कोणी कोठून आणला होता? हा हिरा पुष्कळ वर्षां पूर्वी मी एका जोशास दिला होता, त्या जोशाची काय स्थिति झाली असावी याचा खुलासेवार पत्ता मिळावा यतदर्थ हा इतका खटाटोप चालविला आहे; एरव्हीं आपण कांहीं कोणत्या अपराधांत येत आहां असें नाहीं; मात्र, तुह्मी तों कोणापासून घेतला त्याचा पत्ता लावून द्या ह्मणजे झालें.

हें राजाचें भाषण ऐकून जोतिबास कांहींसा धीर येऊन तो ह्मणाला; "पत्ता लावण्यास कांहीं दूर जाण्यास नको, तो ग्रहस्थ ह्या गांवांतच आहे; पण कबूल मात्र आला पाहिजे."

**रा०**—आपल्या शहरांत आहे? आणि असें आहे तर ज्यानें विकला आहे तो ना कबूल कां करील?

**जो०**—अहो तो पडला पाणक्या भट—दरबार कधीं जन्मांतून पाहिला असेल नसेल, मग तो स्वारी समोर आल्यावर गांगरून जाईल यांत नवल काय?

**रा०**—पाणक्या भट! आणि ज्या पाणक्यानें हिरा विकला तो अजून पाणक्याच का राहिला असेल?

**जोतिबा.**—देव जाणे!! त्या गोपाळराव मुनसफांच्या घरीं तेव्हां तो चाकरीस होता आतां कोठें आहे नकळे.

**राजा.**—गोपाळरावाच्या घरीं? बरें तर मी त्याचा खुलासा काढितों; तुह्मी जा आतां; बोलावावयास पाठवीन तेव्हां मात्र या.

**जोतिबा.**—(हात जोडून ) जी सरकार, हा दास आपल्या चरण सेवेंत सदा सादर आहे. घेतो अज्ञा आता.

जोतिबा निघून गेल्यावर दुसरे दिवशीं राजानें गोपाळराव मुनसफास राजवाड्यास बोलावून आणिलें, आणि माडीत्रे गच्चीवर खासगी नात्यानें गोष्टी बोलतां बोलतां, त्याजवळ रामभटाविषयी गोष्ट काढिली तेव्हां गोपाळराव ह्मणाला, "तो आपल्या लग्ना करितां दोन महिन्याची रजा घेउन परवांच कोकणांत गेला आहे." हें ऐकून राजा त्यास ह्मणाला, "तुमच्या रामभटानें एक दोन वर्षां पूर्वीं एका सोनारास एक हिरा विकिला होता हें तुह्मास ठाऊक आहे काय?" हें ऐकून गोपाळराव विस्मित् होत्साता ह्मणाला; "हिरा! हिरा रामभटानें विकला!! छे! हिरा कोठचा त्याजवळ!!" "कोठचा त्याजवळ हें देव जाणें; पण विकत घेणारा धडधडीत सांगतो की, मी त्या जवळून पंधराशास घतला." असं राजानें सांगितल्यावर गोपाळराव ह्मणतो; "काय पंधराशाला! अहो, सालिना पंधरा रुपयास चाकरी करणारा तो पंधराशास हिरा कोठचा विकणार? आणि तो दोन

वर्षां पूर्वी ह्मणतां; तर त्यानंतर तो माझ्या घरीं अशा लहान वेतनानें पाणक्याच्या चाकरीस कसा होता! परवां गेलातर पुरे दिडशें रुपयांची भर नव्हती जवळ; मग मी आणखी पंचवीस दिले; ही तर द्रव्य संग्रहाची स्थिति!! आणि हिरा घेणारा स्पष्टपणें त्याचें नांव सांगतो, तेव्हां हें नवल नाहीं काय! काय असेल तें असो!!

**राजा.**—नवल खरें; आणि मला हा संशय मघापासून जांचतच आहे, तरी पहा गोपाळराव, आपणास जाचणाऱ्या संशयाचें निराकरण जितकें लवकर करवेल तितकें करावें हा न्याय आहे; ह्मणून सांगतों कीं, कसेंही करून तुमच्या रामभटास येथें बोलवून आणा, आणि काय आहे तें एकदां कळूद्या; आमचे वासुदेवपंत कोंकणचे आहेत त्यांस पाहिजे तर पाठवितो तेथ पर्यंत." हें ऐकून गोपाळराव "ठीक आहे" असें ह्मणून निघून गेला.

त्या नंतर थोड्याच दिवसानीं गोपाळरावानें रामभटास आणून राजापुढें हजर केल्यावर राजानें त्यास हिऱ्या विषयीं विचारिलें; तेव्हां तो "आपणास त्याविषयीं कांहीं एक ठावें नाहीं" असें ह्मणाला. मग त्या जोतिबास साक्षीदारांसह राजानें बोलवावयास पाठविलें.

जोतिबा साक्षांसहवर्तमान राज दरबारीं आल्यावर,

राजानें रामभटाकडे बोट दाखवून त्यास विचारलें; "हे कोण ओळखिलें का ह्याला?"

जो०—जी महाराज. हे रामभट ते हेच." राजा रामभटाकडे वळून ह्मणाला "काय हो, तुह्मी ओळखितां का याला?"

**रामभट.**—मी काय आजच ओळखतो याला?

रा०—एकून याला तुह्मी पुष्कळ दिवसांपासून ओळखितां? मग मघां नाहीं कां ह्मटलेंत?

**रामभट.** महाराजांस मी याविषयीं नाहीं केव्हां ह्मटलें? हिऱ्या विषयीं विचारलेंत, तेव्हां हिरा माहित नाही ह्मणालों.

**राजा.**—बरें, हिऱ्या विषयीं तुह्मास ठाऊक नाहीं? जोतिबा, ऐका. हा हिऱ्या विषयीं जाणत नाहीं ह्मणतो?

**जोतिबा.**—(रामभटास) कायरे, ये, हिऱ्या विषयीं तूं जाणत नाहींस? आणि तूं विकलास मला तो कोठचा?

**रामभट.**—काय कोठचा? हिरा विकला तुला मी? अरे भले गृहस्था नीट ह्मण." हें ऐकून राजानें रामभटास विचारिलें; "ह्यास नाहीं, दुसरे कोणास विकला असाल, किंवा तुह्मी नाहीं तर दुसरा कोणी विकणारा असेल; काय आहे तें सांगा उघड पाहूं?"

रा नें हें ऐकून कपाळावर हात मारून खिन्न

होत्साता ह्मणाला "कर्म माझें!! सरकार, मायबाप माझे तुह्मी. नाहीं तेंच कां विचारतां मज गरीबास? मी मर्त जन्मांत एक्यासुद्धां हिऱ्यास शिवलेलों नाहीं; मात्र, ह्या दोन डोळ्यांनीं तुह्मासारख्याच्या व देवा दिकांच्या अंगावरील हिऱ्याचे डागिणें कायते पाहिलेले; तो मी याला हिरा आणून विकला तो कोठचा! आणि मला तुह्मी हें विचारतां तरी काय!!" गोपाळरावाकडे पाहून डोळ्यांत आश्रें आणून ह्मणाला "तुह्मी तरी कसे आज इतके मजवर निष्ठूर झालां!! ह्यासाठींच का आणलें मला? कां हो मज गरीबाच्या गळ्यांत नाहीं तीच घोरपड अडकवून या भर दरबारांत माझा असा तमाशा मांडिला आहे!! असा जर मी चाड चोर होतों, तर घरींच कां नाहीं मला बांधून मारलें? आतां मी या परदेशांत कोणाकडे बरें पाहूं!!" असें ह्मणून ढळढळ रडूं लागला.

राजानें ही रामभटाची स्थिति पाहून त्यास त्याची थोडी करुणा आली; आणि जोतिबास ह्मणाला "जोतिबा, यास तुह्मी पक्के ओळखिलें? हाच काय? नाहीं तर भलताच गोंवला जाणार! पहा, पुरी आठवण करा. संशय असल्यास तसेंच सांगा." "संशय कशाचा? मी एक चुकलों समजा, पण हे सर्व साक्षी चुकतील?" असें जोतिबा ह्मणाला; तें राजानें ऐकून, जोतिबानें जे

साक्षी आपल्या बरोबर आणिले होते त्या सर्वांच्या जबाण्या घेतल्या; आणि त्यांस आपआपल्या घरीं जावयास सांगितलें.

नंतर रामभटास व गोपाळरावास वाड्यांत बोलावून राजा त्यांस ह्मणाला. "पहा रामभट, काय खरें असेल तें सांगण्यास कोणाची भीडमर्यादा धरूं नको. खोटें लपलें जाणार नाहीं; आज ना उद्यां बाहेर येणारच; मग तुमची काय वाट होईल याचा मात्र विचार करा. कोणी, या गोपाळरावानीं तुमचे जवळ विकावयास दिला होता? पहा, खरें सांगा." हें ऐकून रामभट ह्मणाला "खरें आणि खोटें मला कळत नाहीं; जें झालें व कळलें तें जसेंचें तसेंच सांगावें येवढें मात्र कळतें." "होय, तसेंच सांगा." असें राजा त्यास ह्मणाला; तें ऐकून रामभट ह्मणाला; "तसेंच तर सांगतों मद्यापासून—मी मुळीच हिऱ्यास शिवलों नाहीं ह्मणून." हें ऐकून स्वारीस राग आला आणि रामभटास दरडावून सांगितलें कीं, "जर तूं चांगल्यापणें कबूल येणार नाहींस तर तुला उलटा टांगून मिरगुंड्याची धुरी देईन मग आपोआप कबूल येशील. एरव्हीं का तूं कबूल येणार आहेस? आतां पुढें तुझी तीच वाट!" हें राजाचे शब्द ऐकतांच रामभट लटलटां कापूं लागला, डोळे पाण्यानें

भरून आले आणि केवळवाण्या मुद्रेनें गोपाळरावाकडे पाहून रडूं लागला.

रामभटाची ही स्थिति पाहून गोपाळरावास फारच वाईट वाटलें. मग तो राजापुढें हात जोडून ह्मणाला; "सरकार, या गरीबावर खावंदानीं दयार्द्र दृष्टी ठेवावी; मी पाहिजे असल्यास, ह्या हिऱ्याच्या किंमतीच्या दिडीनें रोख नाणें आपल्या जवळ अनामत जामीनी दाखल ठेवितों." हें ऐकून राजा ह्मणाला; "काय, हा पक्का लबाड नव्हेका? पहा, साक्षीमोज्यासह चौकशी होऊन याजकडे मुद्दा येत असतां, हा लबाड जरा तरी कबूल येतो काय?" हे ऐकून गोपाळराव ह्मणाला; "आतां यांत काय काळें बरें असेल तें ईश्वर जाणे! पण हा आज चार वर्षें माझ्याकडे आहे या मुदतींत, तो खरें बोलणारा, भिडस्त, आज्ञापालक, उद्योगी, सावध, मितभाषणी, दुसऱ्याच्या अडल्या कामांत शक्त्यानुसार मदत करणारा, वेळेस क्षुधेची व निद्रेचीसुद्धा बेपर्वा करणारा आणि शांत असें मला नेहमी आढळण्यांत आला आहे; आणि माझें कुटूंब गुजरून आज दोन वर्षें होत आलीं; तेव्हां पासून माझ्या घरांतील व बाहेरील बारीक सारीक प्रापंचीक व्यवस्था हा पहात आहे; त्यांत सुद्धां याचा हवरेपणा व द्रव्यलोभ, हे दुर्गुण दिसून

नयेतां याची कर्तबगारी व सचोटीची वर्तणूकच पाहून मी ह्याजवर सदा प्रसन्न असतों आणि ह्मणूनच आज सरकार जवळ याज विषयीं इतकी रदबदली करित आहें, तर खावंदांनीं मज गरीबाच्या विनंती कडे लक्ष देऊन याजवर कृपा दृष्टी ठेवावी आणि आलेल्या संशयाची बारिक रीतीनें चौकशी करून ह्याला दोष मुक्त करावें. सचोटीनें वागणाऱ्या लहान थोरांस क्षमा करावी हें आपलें ब्रीदच आहे; आणि थोरांचें भूषण तें हेंच. यांत मी काय विशेष सांगावें! हें ऐकून राजा ह्मणाला; "गोपाळराव, तुह्मी याच्या सचोटीपणा विषयीं जरी खात्री देतां तरी हिऱ्याचा पत्ता लागे पर्यंत मी यास कैदेंत ठेवणार; मात्र त्याचे हाल जाचा विषयीं तुह्मी निर्भय असा; तो भट आहे. पण गोपाळराव, मी तुह्मास निक्षून सांगतों कीं हिऱ्याचा खुलासेवार पत्ता लागे पर्यंत तुह्मी तरी यापासून मोकळे झालां असें समजूं नका; आज तुह्मी हिऱ्याच्या दिडीनें नाणें ठेवण्यास तयार आहां, पण पिढिन् पिढिचीं पालेंमुळें ह्मणून निवतील हें पक्कें लक्षांत वागवा; तुह्मी आजपासून महिना पंधरा दिवस रजेवर राहून याचा पत्ता मिळवा; जा आतां." हें राजाचें वहिमी हृदयभेदक भाषण ऐकतांच गोपाळरावाचा चेहरा गर्‍दिसीं उतरून काळा-

ठीकर पडला; या पुढें राजास काय उत्तर द्यावें हें त्याला सुचेनासें होऊन म्लान वदन होत्साता वर उठला आणि राजास मुजरा करून निमुटपणें खालच्या मानें चालता झाला.

गोपाळराव गेल्या नंतर राजा पुनः रामभटास विचारूं लागला; "पहा रामभटजी, खरें काय आहे तें सांगून तुह्मी मोकळे व्हा. तुमचा गरीबाचा छळ करावा हें मला मनापासून आवडत नाहीं. अशीं कृत्यें तुह्मा सारख्या भोळसराकडून करविल्याशिवाय तुमच्या हातून व्हायचीं नाहींत हें मी पक्कें जाणतों. उगाच भिडेंत पडून आपणावर विघ्न ओढवून घेऊं नका. गोपाळरावानें तुमच्या जवळ तो हिरा विकावयास दिला होता असेंच कीं नाहीं?" रामभट मुखांतून एक शब्द सुद्धां न काढितां टकमक राजाकडे पहात स्तब्ध उभा होता असें पाहून त्यानें पुनः बोलण्यास सुरुवात केली; "गोपाळरावाची आतां तुह्माला काय पर्वा आहे? तसेंच असेल तर होय मात्र ह्मणा; आणि घ्या वीस मोहरा आणून देतों त्या; जा आपल्या गांवास; आणि या लग्न सोहळा करून; तुह्मास देतों एक लहानशी असामी या दरबारांत; पाणक्याच्या नोकरींत कां जन्म गमावतां! तुह्मी आतां माझे अहां; भिऊं नका. होय ह्मणा पाहूं." हें राजाचें

भाषण ऐकून रामभट ह्मणाला; "महाराज, मी कशास कोणाला भिऊं? तुह्मी मला छळलें व मारलें ह्मणुन का, मी तुमचा नाहीं असें होणार आहे? मी तुमचाच; माय बाप तुह्मी माझे, कोणाच्या भयानें, लाजेनें किंवा लोभानें नाहीं तें होय, आणि होय तें नाहीं सांगणारा मी!! पहिल्या सपाट्यास जसेंचें तसें सांगावें ही माझी मूळ खोडीच आहे. गोपाळरावा विषयीं होय कसें ह्मणूं? उगाच? माझा ज[illegible] तर मला साक्षी आहे!! मघापासून खरेंच आहे तें सांगतों. हवे तें करा; हा येथें आहें मी. जीव घ्या, का सोडून द्या. दुसरें काय सांगू." इतकें ह्मणुन गप्प बसतो. राजानें हा कांहीं केल्या कबूल येत नाहीं असें पाहून त्यास कैदेंत ठेविलें. नंतर राजा एके दिवशीं स्वतःच विचार करित असतां आपल्या एका कारकुणास ह्मणाला; "अहो नरहरिपंत, अमुक मालच्या किंवा त्याच्या एक दोन मागच्या पुढच्या मालच्या आपल्या खासगी वह्या चाळून पहा बरें; त्यांत कोणा एका जोशास हिरा देऊन संभावना केल्याची नोंद असून, त्यांत त्याचें नांवगांव ठावठिकाण नमूद केलेली आहे काय; असल्यास शोधून काढा पाहूं." हा राजापासून हुकूम सुटतांच कारकूनांनीं जुन्या वह्या शोधा[illegible] [illegible]याचा उद्योग चालविला आणि एक

दोन दिवसांनीं, ती नोंद ज्या वहींत होती ती वही राजापुढें आणून दिली. त्यांत "**भिकाजी वामन जोशी तरसटकर** राहाणार खेडें रांगोळी जिल्हा नाशीक" अशा नांवा गांवा सुद्धां खुलसेवार नोंद होती ती वाचून त्याच्या शोधा करितां राजानें कांहीं गृहस्थांस नाशिकास पाठविलें.

इकडे गोपाळराव आपल्या घरीं निघून आला तो अगदीं भांबावल्या प्रमाणें होऊन नाना प्रकारचे विचार करूं लागला; "हें काय, कोणी हें आह्मांवर कुभांड रचिलें असावें बरें!! ह्या सोनारास कोणी तरी पुढें करणारा असावा! पण यास कारण काय? मीं किंवा रामभट कधींच कोणा बरोबर भांडलों किंवा विरूद्धपणानें वागलों असें नाहीं; मग आज हा प्रसंग काय? हिरा काय, आणि रामभटानें विकला कोठचा!! बिचाऱ्यास मीं आणून गोत्यांत घातलें ना! त्यास काय केलें असेल आतां! तो काय ह्मणत असेल मला! त्याची कींव धरून बोलायला गेलों तर, माझी पाळेंमुळें खणून निघतील असें का सांगावें मला!! हा शब्द नाहीं; लाथ मारिली माझ्या उरांत!! धिक् असो ह्या जिण्यास!! आतां मीं शोध कशाचा लावणार! एकुन मला एथून हांकवून लावायचें मनांत! अशा स्थितींत राजीनामाही देतां येत

नाहीं! शेवटीं बेअब्रू का होणार माझी! हर हर! ईश्वरा, विद्येचें का हें फळ! का लहान पणापासून सचोटीनें वागत आलों त्याचें हें प्रायश्चित्!! इच्छा तुझी!! अशी तळमळ करीत खोलींतल्या खोलींत तो पडला राहिला.

इकडे रामभटास एका आंधारी कोठडींत कोंडून ठेविलें होतें तो खालीं बसून भिंतीवर मान टाकून आपणाशींच ह्मणतो; "लग्नास ना गेलों होतों मीं! इतक्यांत नाहीं तेंच विघ्न येऊन कसें ओढून आणिलें मला घरांतून! बाबा माझी वाट पहात असतील ना!! कोण सांगेल आतां त्यांला! किती ते हौसेंत आले होते मला पाहून! आणि कसा एका क्षणांत दूर झालों त्यांपासून!! त्यांच्या शिकवणी प्रमाणें कधीं लबाडी, चाहाडी, आळस, चोरी किंवा कोणा बरोबर तंटाभांडण केलें नसून, आज कसा मीं ह्या कैदेंत पडलों! हिरा मीं विकिला हें तो सोनार ह्मणतो तरी कसा; माझेंच नांव कां घेतो तो! मला गरीब सारखा पाहून आपल्यावरलें संकट लोटलें मजवर दुसरें काय! पण राजानें तरी विचार करायचा होता!! आखेर पर्यंत का खरें लोपून लबाडीच्या वाहिमांत मीं मरणार!!" असी रामभटाची बडबड चाललेली आहे इतक्यांत, खोलीचें दार उघडून ब्राह्मण जेवण घेऊन आंत आला; त्याला पाहून रामभट ह्मणाला.

"अहो, यत्किंचित लबाडीसमुद्धां मी रात्रंदिवस भिणारा, व ज्या यजमानाच्या एका मिठाच्या खड्या साठींसुद्धां कळकळ वाळगणारा, त्या यजमाना समक्ष जेव्हां मला त्या सोनारानें "तूं मला हिरा विकिलास तो कोठचा?" असा लबाडानें बेधडक प्रश्न केला, तेव्हां त्या भल्या गृहस्थास माझ्याविषयीं काय बरें वाटलें असेल? मला तर त्याचा जीव घ्यावा असें वाटलें त्या वेळीं. निरर्थक ह्मणंजे काय! माझ्या स्वप्नींसुद्धां नाहीं! साक्षी ते कोण? लफंगे ज्यांस ह्मणतात त्यांतलेच असतील कोणी! इतकी हुबेहूब लबाडी करणारे असतात, अँ!! धन्य बोवा त्यांची! आणि ती सुद्धां राजा पुढें अं!! बरें, राजानें देखील मला लबाड ठरविलें? आजका सत्य बुडालें? मी सर्वांत लबाड ठरलों ना? आतां हें तोंड कोणास हो दाखवूं? मरण येतें तरी पुरवतें! विषतरी आणा एखादे दिवशीं अन्नांत कालवून आणि चुकवा ह्या जन्माच्या यातनां!" हें ऐकून तो ब्राह्मण ह्मणाला; "ह्या हिऱ्याच्या प्रकरणाचा शेवट कसा होतो नकळे! आतां सरकार स्वारीनें नाशिकास कोणीं "तसेटकर" या आडनांवाच्या मनुष्यास आणावयास पाठविलें आहे, मग तो तरी कबूल येतो का तुमच्याच जोडीस येऊन बसतो नकळे!" रामभट ह्मणाला; "तसेटकर" कोण?

ह्या आड नांवाची माझी आते आहे" "तुझी आते ? असेल. पण तो पुरूष आहे; कारण त्याचें नांव "भिकाजी वामन जोशी तरसटकर" असें ऐकतों." हें ब्राह्मणाचें भाषण ऐकून रामभट ह्मणाला "भिकाजी का वामन हें माझ्या आतेच्या दादल्याचें नांव होतें असें एकदां बाबा बोललेलें आठवतें; तोच असल्यास यांस कोठचा पत्ता मिळतो त्याचा आतां! तो मरून सुमारें पंधरा वीस वर्षे झालीं; आणि त्या वेळेपासून माझी आते आमच्या घरीं येऊन राहिली आहे; तिला पोर ना बाळ. जो भाकर तुकडा मिळतो तो आह्मा बरोबर खाऊन खुशाल आहे" वगैरे गोष्टी झाल्यावर रामभटाचें भोजन आटोपतांच तो ब्राह्मण बासनें घेऊन बाहेर आला आणि खोलीच्या दरवाज्यास कुलूप लावून चालता झाला. त्यानें जेव्हां ही बातमी सरकारापर्यंत लाविली तेव्हां राजानें रामभटास आपल्या समोर बोलावून त्यास तद्विषयीं विचारिलें; तेव्हां तो ब्राह्मणा जवळ बोललेला होता तें सर्व कबूल आला. तें ऐकून राजा त्यास ह्मणाला; "मग हिरा तुला ठाऊक नाहीं ह्मणून कां ह्मणतोस? तो तुझ्या आतेनें तुझे जवळ विकावयास दिला होता असें कां सांगत नाहींस?" रामभट ह्मणाला; "छे, हिऱ्याची मात्र गोष्ट बोलूं नका महाराज. आते जवळ हिरा

कोठचा असणार !! गरीब बापडी ती !!" राजा ह्मणाला; "बरें, मीं देतों तो तरी तूं नेऊन देशील तिला ? "छे; मीं नेणारही नाहीं; आणि ती तो घेणारही नाहीं; तिला जें नेऊन द्यावें तें विषा प्रमाणें कडूच; मग किती कां मजेची वस्तू असेना! ती हा हिरा घेईल? उलट चार शब्द मात्र मला बोलेल! महाराज यवढें मात्र मला सांगूं नका; मीं आपली क्षमा मागतों." असें रामभट ह्मणाला; "ठीक, ठीक आहे आतां कांहींसें जुळत जुगत येतें. पुढें कसा तुझा खरेपणा आहे तो पाहीन." असें ह्मणून रामभटास पुनः कैदेंत पाठविलें; आणि जो रामभटास आणावया करितां त्याच्या घरीं गेला होता, त्यालाच रामभटाच्या आतेस आणण्या करितां कोंकणास लावून दिलें.

रामभटाचे घरीं तो गृहस्थ येतांच त्यास त्याच्यां ह्मातार्‍या बापानें रामभटा विषयीं बरेच साशंकित प्रश्न विचारिले; पण तो गृहस्थ मोठा चतुर असल्यामुळें त्यानें त्या सर्व प्रश्नाचीं उत्तरें अशी कांहीं दिलीं कीं, जेणें करून तो ज्या कार्यास गेला होता तें कार्य त्यानें सहज रीतीनें घडवून आणिलें; सारांश थोडे दिवसांत तो रामभटाच्या आत्येस व त्याच्या बापास बरोबर घेऊन इंदुरास आला. शहरांत आल्यावर त्यांस प्रथम आपल्या

वरीं उतरून नंतर त्यानें राजास वर्दी लाविली, तें ऐकून त्यांचा उत्तम रीतीचा परामर्श ठेवण्या विषयीं त्यास ताकीद दिली. नंतर एके दिवशीं प्रातःकाळीं त्या वृद्ध भावाबहीणीस राजानें आपल्या वाड्यांत बोलवून नेलें आणि आपल्या तैनातेंतील दोन सभ्य गृहस्थ बरोबर घेऊन माडीवर गेला, तेथें रामभटाच्या बापास गादिसीं बसवून, त्याच्या बहीणीस दालनाच्या दरवाज्या आड सत्रंजी टाकिली होती तिजवर बसावयास सांगितलें. नंतर स्वारीनें रामभटाच्या बापाचें नांव, गांव, वय, रोजगार वगैरे विचारिल्यावर "ही आपली बहीण अशा स्थितींत आपल्या जवळ किती दिवसांपासून आहे." ह्मणून विचारिलें. तो ह्मणाला; "झालीं पंधरा वीस वर्षे." राजा ह्म०—"ह्यांस कांहीं आपत्य आहे काय?" तो ह्मणाला. "नाहीं." "बरें, ह्या बाई, "भिकाजी वामन जोशी तर्सटकर." ह्यांच्या कांहीं संबंधी लागतात काय?" असा राजानें प्रश्न केला तेव्हां "संबंधी ह्मणजे! अहो तर्सटकर जोशीबुवांचें हें कुटुंब." असें रामभटाच्या बापानें सांगितलें; तें ऐकून स्वारी विस्मित् होत्साती ह्मणाली "अँहं; एकून जोशीबुवांचें हें कुटुंब! किती हो ते नामांकित जोशी होऊन गेले! आणि काय त्यांचा लौकीक!! त्यांच्या मरणोत्तर त्यांच्या कुटुंबाची

ही दशा व्हावी !! अहो, याच दरबारांतून मोठमोठ्या देणग्या देऊन त्यांची संभावना केलेली ! तें सर्वच नाहींसें कसें झालें? दैव गती विपरीत आहे !! पण, महाराज, जोशीबुवांस या दरबारांतून एक मौल्यवान हिरा देऊन त्यांची संभावना केली होती, ही गोष्ट आपणास विदीत आहे काय?" ह्मातारे बुवा ह्मणाले; "विदीत कशी असणार? जोशीबुवा जीवंत असतां ते होते ह्या तर्फेस आणि मी राहिलों कोकणांत; एक एक तप कोणाच्या कोणास भेटी नव्हत्या; तसेंच पडलें आणि सडी जेव्हां झाली बया तेव्हां पडली धोंड येऊन गळ्यांत. मला त्यांच्या चालत्या काळांतलें कांहीं एक माहित नाहीं." हें ऐकून पुनः स्वारीनें त्यास विचारिलें; "तुह्मास त्या विषयीं मुळींच ठाऊक नाहीं? बरें नसेल; तरी तुमच्या बहिणीस तें सर्व विदीत असण्याचा संभव आहे. बरें चला आपण त्यांस समक्ष विचारूं" असें ह्मणून त्या सर्वांस समागमें घेउन ती बाई बसली होती त्या कवाडाच्या जरा आंत स्वारी येऊन उभी राहिली, तेव्हां ती बाई ओणव्यानें उभी राहलेली पाहून, राजा तिला ह्मणाला; "बाई, उठूं नका; बसा. मी केवळ आपल्या मुला प्रमाणें आहे. तुमच्या अशा विपत्तींत मजपासून कांहीं सेवा घडावी व आपणा मातोश्रीचा आशीर्वाद

मिळावा यतदर्थ हा एवढा खटाटोप चालविला आहे; तर तुम्हीं लेंकरावर दया करून मी विचारितों तें, मनांत कोणता संकोच किंवा भय न धरितां सर्व खुलासेवार सांगावें इतकीच या दासाची मातोश्रीस विनंती आहे." हें राजाचें लीनतेचें भाषण ऐकून बाईला फार समाधान वाटलें; मग ती भिंतीचा टेंकावा धरून आपल्या लुगड्याचा पदर मुखास लावून बाजूस उभी राहिली, आणि राजानें बोलण्यास आरंभ केला.

**राजा ह्म०**—बाई, जोशीबुवा कांहीं वर्षां पूर्वीं या राजधानीस आले होते हें तुह्मास ठाऊक आहे काय?

**बाई.**—होय, आहे ठाऊक.

**राजा.**—बरें, त्यांची इकडून काय संभावना झाली होती हें आपण जाणतां?

**बाई.**—होय, सर्व काय तें जाणतें?

**राजा.**—काय जाणतां? इकडून त्यांस एक मौल्यवान हिरा देण्यांत आला होता हें तुह्माला माहित आहे?

**बाई.**—(मोठ्यानें सुस्कार टाकून) होय. आहे माहीत, आहे सर्व कायतें ठावें मेलें. त्यास आतां काय करितां!!

**राजा.**—अशा खंती होऊं नका. करायचें काय? पण त्या हिऱ्याची काय वाट झाली हें मात्र समजूंद्या.

तो तुह्मी किंवा तुमच्या यजमानांनीं विकला, किंवा चोर लफंग्यांनीं तुह्मांपासून हिरावून नेला, किंवा बुवांच्या पश्चात् कोणी सावकारानें तुह्मांस फसविलें, किंवा तुमचे गोत्रज दायीदांनीं तुह्मास लुबाडिलें, यांतून जें खरें असेल तें निर्भयपणें सांगा. तुमचा हिरा मी ह्या घडीस तुह्मा पुढें आणून देईन. खरें मात्र कळूंद्या.

**बाई.**—(डोळ्यांत आसवें आणून) माझा हिरा मला कस्सा हो आणून देतां आतां! गेला तो! केली मला उघडी! नकोग बाई ती जळली आठवण!! (असें ह्मणून रडूं लागते).

**राजा.**—(ही बाई आपल्या पती साठीं खंती होत असावी असें जाणून) बाई, ही मृत्यू लोकाची वस्ती अशीच आहे. उभयतां कांहीं बरोबर जात नसतात; पुढें मागें होत असतें. पण, चतुर पुरुष जे आहेत ते ही काळाची गती लक्षांत वागवून शक्त्यानुसार आपल्या पुढिलांची सोय व्हावी अशी कांहीं योजना करून ठेवित असतात, आणि आपले यजमानही त्याच योग्यतेचे होते, तरी आज हा त्यांच्या कुटुंबावर द्रारिद्रावस्थेचा प्रसंग पाहून मोठें आश्चर्य वाटतें!!

**बाई.**—तिकडून कायती सर्व सोय करून ठेविली

होती; पण मेली मींच हतभागी, त्यास काय कोणाचा उपाय?

**राजा.**—तें हतभाग्य कोणत्या तऱ्हेनें तुमच्यावर आलें हेंच मी विचारतों; सांगा ऐकूद्या तरी?

**बाई.**—काय सांगूं कपाळ माझें! अहो, मेले तेव्हां मज जवळ किं हो सहा वर्षांचा (इतकें ह्मणून मोठ्यानें रडण्याचा हेलोसा काढून धडादिशीं खालीं बसली आणि ह्मणाली) बाळ तो हो, होता!! (खालीं मान घालून हुमक्या हुमक्यानें रडते).

**राजा.**—(दुःखीत होत्साता) अरे अरे!! तोही गेला वाटतें! खरेंच, हें दुःख अपरिहार्य खरें! यास काय इलाज! ईश्वरेच्छा ह्मणून रहावें, झालें: उगी. बाई, हा शोक तुमच्या जन्मास लागला आहे, तरी मोठें मन करून स्वस्थ असावें; दुसरें काय? बरें बाई, तो हिरा कोणा जवळ जोशीबुवांनीं ठेविला होता?

**बाई.**—(डोळे पुसून) मरणाच्या पंधरा दिवसां पूर्वीं तो हिरा एका रुप्याच्या तायतांत घालून, तो ताईत, आपल्या हातीं मरणाऱ्या बाळाच्या गळ्यांत बांधिला होता; आणि मला असें सांगून ठेविलें होतें कीं, "हा बाळ मुंजी जोगा होई पर्यंत तूं येथें दायदां जवळ रहा; नंतर त्याला घेऊन मुंबई किंवा पुणें शहरीं जा, आणि

तेथें हा हिरा वहीवाटून त्याची जी रक्कम येईल, ती पेढीवर अनामत ठेव; आणि त्याच्या व्याजानें त्याचा विद्याभ्यास व तुझा चारितार्थ चालीव." आणि सांगिलें होतें "हा मोठा विद्वान होऊन भाग्यशाली होईल" हें घरचें जोशीपण घरास नाहीं हो खरें झालें! (रडूं लागते)

**राजा.**—बाई, उगी रहा. झालें तें का आतां येतें? पण हिरा मग काय केलात?

—**बाई.**—काय सांगूं! माझा बाळ आणि तो हिरा, हे दोघेही एके घटकेस किहो गमावले!!

**राजा.**—(विस्मित् पणें) ते कसे?

**बाई.**—यजमानांचा काळ होऊन एक वर्ष लोटल्यावर, मी कोंकणांत जाऊन येण्याच्या इराद्यानें सोबत पाहून मुंबईस गेलें, आणि मुंबई बंदरांतून बाळा समवेत आगबोटींत बसून निघालें ती, हरणईच्या खाडी पर्यंत गेल्या नंतर आगबोट फुटली; मग काय विचारतां तो प्रसंग!! सर्वच कल्लोळ झाला! त्यांत किहो माझा सोना गळ्यांतील तायतासह बुडाला? आणि मी रांड राहिलें करंटी मागें गाणीं गायाला!! [अश्रु ढाळते.]

**राजा.**—त्या वेळीं तुमचा बचाव कोणत्या रीतीन झाला?

**बाई.** मी माझ्या बाळास घट्ट पोटासरसा धरून,

"देवा देवा" ओरडत असतां, मनुष्यांस उतरविण्या करितां आगबोटी खालीं मचवा आणून लाविला होता त्यांतून, कोणीं माझा हात धरून मला खालीं ओढिलें, तेव्हां बाळाच्या पाठीचे माझे हात सुटून तो तसाच गळ्यांत लोंबत राहिला; मी तशीच शिडीच्या पायरीवर आलें इतक्यांत मागून कोणी मेल्या यमानें मला जबर धक्का दिला, त्या बरोबर गळ्यांतला बाळ सुटून खालीं पडला आणि मी पडलें मचव्यांत; तेव्हां मी ढोरा प्रमाणें हंबरडा फोडून मचव्या खालीं उडी घेण्यास धांवलें; मग मचव्यांतील लोकांनीं मला धरून खालीं बसविलें नंतर लागलाच मचवा चालु झाला तो रत्नागिरीच्या बंदरास येऊन लागला. तेथें खालीं उतरल्यावर मला ओढीत ताणीत आणून भावाच्या स्वाधीन केलें. तीं मी आज दीन पर्यंत मेल्या वैऱ्या समुद्राचें तोंड पाहिलें नव्हतें.

राजा. अरेरेरे! किती हा दुःखाचा प्रसंग! खरेंच, वित्तासह बाईचें एकुलतें एक बाळ गट्ट करणारा समुद्र हा बाईचा कोण्या जन्माचा वैरी खरा!! असो. बाई, भिऊं नका. तुमचा हिरा अशा रीतीनें जरी हरवला आहे, तरी तो तुह्मांस परत मिळूं शकेल; पण, मनुष्य जीवित नाशिवंत आहे तें पुनः मिळणें दुर्लभ! आतां जें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मिळेल तोच लाभ असें जाणून, [illegible] हिरा माझ्या हातीं-मग कसा कां येईना आला आहे तो घेउन, राहिलेलें आयुष्य तुह्मीं देव देव करून कंठावें हें मला बरें दिसतें.

**बाई.**—[विस्मित्‌पणें] काय! माझा हिरा हातीं आला आहे!! अन् माझा बाब्या नाहीं का आला आपल्या हातीं? कोठें हो गेला सोना माझा!! [रडूं लागते]

**राजा.**—[खिन्न होत्साता.] नाहीं तुमच्या बाळा विषयीं कांहीं एक मी जाणत नाहीं. पुढें करूं तपास त्याचा.

**बाई.**—[दुःखित स्वरानें] कस्साहो तपास करितां! मेल्या समुद्राला गोड का लागला माझ्या पोटचा गोळा गिळायाला? आणि हिरा कडू ह्मणून का ओकून टाकला बाहेर? का तें बहीणी जमीनीचें कारटें जाणून सोडलें त्याला!! कायरे देवा! माझ्या बाळाचा असा नाहीं का कोणी सगा उमटला त्याला काढयाला!! हर हर! काय वाटलें असेल त्याला बुडतानां! शेवटचे त्याचे "आई आई काय ग" हे शब्द माझ्या कानांतच आहेत ना अजून! अगे सटवे धरत्रे, माझें रत्न कां चोंदलेंस पोटांत तूं? तुझा हिरा जगांत चमकतो तें का आतां मला बरें

दिसेल? [राजाकडे पाहून] आणा तो करत्यें त्याला मी गट्ट आणि जात्यें बाळाच्या भेटिला !!

राजा हिरा देत असतां ती बाई तो गिळावयास तयार झाली आहे पण तिच्या मुखांतून "द्या" असा शब्द येत नाहीं हें पाहून रामभटाच्या बापास फार वाईट वाटलें; तो मनांत ह्मणतो, "हिरा जर आज ही घेती, तर मला माझ्या जोजारांत हिची मोठी मदत होती; पण करंटी ती करंटी! देव देतो आणि कर्म नेतें तें असें" उघडपणें ह्मणतो; "कायग, ए, वेणे, असा शोक कोठवर करणार तूं? झालें गचलें तें का येतें आतां असें रडून न् आरडून? घेईस ना कां हिरा महाराज देतात तो? वेडी कुठची. होय ह्मण. ह्मण होय. द्या ह्मण--घे मागून. अगे होय ह्मण तरी होय ह्मण; फुटलें तुझें कपाळ! औदशे होय ह्मण. कां खातेस कपाळ माझें? खाल्ला जीव इणें! आणि भोवली मला ही औदसा!! देव धर्म कां करीत नाहींस, कोण नको ह्मणतो तुला?"

ह्मातारेबुवा संत्तापले असें पाहून राजा त्यास ह्मणाला. "आतां जा तुह्मी हिला घेऊन विऱ्हाडीं जा, आणि ही जरा शांत झाली, ह्मणजे युक्तीच्या रीतीनें हिला चार विचाराच्या गोष्टी सांगून ही ताळ्यावर आली ह्मणजे मला कळवा; मग मी तिचा हिरा तिच्या स्वाधीन करीन.

नंतर गाडींत बसवून त्या उभयतांस उतरलेल्या घरीं परत लावून दिलें; आणि राजा आपल्या बरोबरच्या दोघां गृहस्थांबरोबर बोलत बसला.

राजा.—पहा, यांत त्या रामभटाची व गोपाळरावाची कांहीं लबाडी असावी असें तर आतां मला वाटत नाहीं; कारण तो हिरा तायतांत बंद केलेला समुद्रांत हरवल्यास आज सुमारें वीस वर्षे झालीं ह्मणून सांगते त्या दिवसापासून हिला त्याचें दर्शन नाहीं व त्याचा लोभही नाहीं; आतां कोणत्या रीतीनें जरी तो यांच्या हातीं आला असला, तरी तो सांडलेला यांस सापडला असें होतें; चोरीनें किंवा लुच्चेशाईनें तो त्याच्या मालकापासून काढिला असें होत नाहीं; आतां भीतीनें ते नाहीं ह्मणोत, तरी चोरीच्या आरोपांत ते येत नाहींत त्या अर्थी त्यांस मुक्त करावें हें योग्य आहे." असें ह्मणून रामभटास मोकळें करण्याचा हुकूम दिला आणि गोपाळरावास बोलवावयास पाठविलें.

गोपाळराव राजवाड्यांतून गेल्या दिवसापासून नोकरीवर रूजू न होतां, सचिंतपणें घरांत निवांत पडून राहिला होता. त्याला जेव्हां सरकाराकडून बोलावणें गेलें, तेव्हां त्याचें पोटांत धःस् झालें. त्याला वाटलें आतां जर मला "काय केलेंस?" असा प्रश्न विचा-

रला, तर त्याचा जबाब काय द्यावा ! हें नाहीं तेंच माझ्या कर्मांत काय ? हे दीन दयाळा नाथा ! सर्व तूं साक्षी ! ! " असा विचार करीत करीत राजवाड्यांत आला. राजानें त्याला पहातांच मोठ्या आदरसत्कारानें माडीवर नेलें, आणि तो राजवाड्याहून गेल्या दिवसापासून तो, वेणूबाई परत बिऱ्हाडीं जाई पर्यंत ज्या ज्या गोष्टी घडून आल्या त्या त्या सर्व त्यास निवेदन केल्या. वेणूबाईची आगबोटींतील हकिगत सांगण्यास जेव्हां राजानें आरंभ केला, तेव्हां गोपाळरावाचे डोळे अगदीं पाण्यानें भरून आंगावर कांटा उभा राहिला, नाका तोंडावर घाम सुटून दुःखानें कंठ अगदीं भरून आला, अशा स्थितींत हा असतां, राजा जेव्हां ह्याला एकादा प्रश्न विचारी तेव्हां, हा उपरण्यानें आपले डोळे पुसीत मोठ्या पराकाष्टेनें गहिंवरत त्याचें उत्तर देत असे. व कधीं निरोत्तर होऊन मानच डोळवून वेळ मारून नेत असे. ही गोपाळरावाची स्थिति पाहून राजा त्यास ह्मणाला; " गोपाळराव तुह्मी तरी अगदीं कोंवळ्या मनाचें अहां. अहो, प्रत्यक्ष त्या बाईच्या प्रसंगाच्या वेळीं जर तुह्मी असतां, तर मला वाटतें तुह्मी तान्ह्या मुला प्रमाणें रडलां असतां; ! असो. आतां तुह्मी व तुमचा रामभट या बाबतींत अगदीं निर्दोषी अहां. कांहीं मनांत आणू

नको बरें. संशय मोठा खोटा आहे. बरें तर या आतां. आपण उद्यापासून आपल्या नोकरीवर रूजू व्हावें." हें ऐकून गोपाळराव ह्मणाला; "जी सरकार, घेतों आज्ञा ? ती बाई कोणाच्या घरीं उतरली आहे ?" राजा ह्मणाला; "सदाशीवपंतास आहे ठाऊक; त्यास जातांना विचारा."

गोपाळराव सदाशीवपंतास विचारून जो निघाला तो थेट ती बाई ज्या घरीं उतरली होती त्या आंगण्यांत येऊन उभा राहिला. इतक्यांत समोरून रामभट मोठ्या लगबगीनें पुढें येऊन गोपाळरावास नमस्कार केला आणि ह्मणाला; "माझे बाबा व आते येथें आलीं आहेत; हिऱ्याचा सर्व खुलासा मिळाला; किती हो एकाएकीं गजब केला त्या हिऱ्या साठीं आपणावर ! आणि काय तरी तें संकट !! असो. शेवटीं अब्रूनें सुटलों येवढें बरें झालें ! हिरा तर माझ्या आतेचा असें टरलें; आणि महाराज तो तिलाच देणार." हें ऐकून गोपाळरावानें त्यास विचारिलें; "कोठें आहे तुझी आत ? मला नेऊन दाखवितोसका ती ?" "होय होय; या आंत. असे बाहेर उभे कां ? बाबाचीही तुमची गांठ घालून देतों मी;" असें रामभटानें गोपाळरावास सांगून तो धांवत घरांत गेला, आणि गोपाळराव ओटीवर येऊन दारांत वाट पहत उभा राहिला. रामभट मोठ्या लगबगीनें आपल्या आतेस

माजघरा पर्यंत बरोबर घेऊन आला आणि तिला तेथें उभी करून, दाराशीं गोपाळराव होता त्यास "ही आते; या आंत." असें सांगून बापास आणावया करितां धांवला. वेणूबाई कंबरेस हात देऊन खिन्न वदन होत्साती माजघरांत एकटीच उभी होती अशा संधीस गोपाळराव धांवत आंत आला आणि वेणूबाईच्या गळ्यास मिठी मारून "आई कोठेग गेली होतीस टाकून मला तूं?" अशा करुण स्वरानें ओरडला तेव्हां, वेणूबाई मान विरहीत होऊन गोपाळरावाच्या खांद्यावर मान टाकून निचेष्टितपणें टकमक त्याच्या मुखाकडे पाहूं लागली. गोपाळरावानें तिला तशीच खांद्यावर सांवरून तिजकडे पहात गहींवरत "आई तूं समुद्रांत नाग बुडली होतीस? मचव्यांत का खालीं पडलीस तूं? मला ग कां आगबोटींत सोडलेंस तर? कांग आई तूं टकमक पहातेस, निष्ठुर का झालीस? तुझा गोपाळा नाग मी? लाडका साद घाल ग आई मला, ऐकूंदे तुझे तोंडचा. तुझे ममतेस लहान पणींच मी अंतरलों, आतां तरी पुरीव कोड. आगबोटींत तुझ्या कडेवर बसून खाऊ साठीं रडत असतां मला घट्ट पोटासरसा धरून "देवा देवा" ओरडत धांऊ लागलीस, त्या वेळे पासून नाग आई तुझ्या गळ्याची मिठी सुटली होती ती आज" इतकें ह्मणून रड्याचें भरतें येऊन स्तब्ध राहिला.

तेव्हां वेणूबाई त्याचें मुख कुरवाळीत ह्मणाली; " कोण, गोपाळाच कायरे माझा तूं? " इतकें बोलून कांहीं वेळ नेत्र झांकून रहाते. पुनः साशंकित होत्साती बोलूं लागते " अँ? काय! कोण! हा बाळ माझा!! नाहीं! आहे का? होय! मी आहें का? जागी आहें? नाहीं! दादा? कोण? रामा? कायरे बाबा बोलतोस तूं? होय माझा बाळ तूं!" असे ह्मणत गोपाळरावाचे मुखावरून हात फिरविला. आईची अशी भ्रमिष्टा प्रमाणें स्थिति पाहून गोपाळराव तिला ह्मणाला; " आई, मी रामा नव्हे तुझा गोपाळा? एकदा नीटपणें न्याहाळून पहासील तरी मला? असें काय बोलतिस! माझ्या आंगावर तूं असून मज-बरोबर बोलत आहेस ती निजली आहेस कसी!! मी समुद्रांत बुडालों नाहीं; तुझ्या पुण्याइनें वाचलों आहें. आई, मी तुला आगबोटींत " बाबा सारखि तूं मरसील काय?" असें बोललों होतों तें आठवतें काय?" हे शब्द ऐकून वेणूबाईनें गोपाळरावास घट्ट मिठी घालून खळ खळ रडूं लागली. कांहीं वेळानें रडें सावरून गोपाळ-रावाच्या मुखाकडे पहात ह्मणाली " माझ्या लाडक्या, तूं त्या घोर प्रसंगांतून कसारे वाचलास? राजानें का ह्या वाढविलें तुला? मला कां नाहीं भेटविलें इतकें वर्षांत? मघा " हिरा देतों " ह्मणाला; होय खरें. हिरा—हाच

सोना हिरा माझा !!" असें ह्मणून गोपाळरावाचे मुके घेते. गोपाळराव सद्गदित होत्साता ह्मणाला. "जें ज्या वेळीं व्हायचें तीच वेळ व तोच दिवस दैवानें जेव्हां उजेडतो तेव्हां सर्व कायतें होतें. राजास मज विषयीं कांहीं एक माहित नाहीं, व मला त्यानें वाढविलेंही नाहीं"

वेणू०—तर तूं कोठे रे इतका लहानाचा मोठा झालास ? कोणी रे तुला जेवूं खाऊ घातलें ? आतां कोणरे तुझ्या पाठीशीं आहे ?

गो०—आई स्वस्त हो सांगतों ऐक" असें ह्मणून परस्पर समोरा समोर खालीं जमीनीवर बसलीं. इतक्यांत रामभट आपल्या बापास व त्या घराच्या मालकास घेऊन तेथेंच आला, घरच्या मालकानें गोपाळरावास जेव्हां, वेणूबाईच्या पुढ्यांत जमीनीवर बसलेला पाहिला, तेव्हां त्यानें मोठ्या लगबगीनें त्यास गादी आणून दिली; त्या गादीवर गोपाळरावानें रामभटाच्या बापास बसवून त्यास नमस्कार केला. मग वेणूबाईने आपल्या भावाकडे पाहून त्यास विचारिलें; "दादा, हा कोण, तुह्मी ओळखिलें काय ह्याला ? हें ऐकून घरच्या मालकानें "हे रावसाहेब मुनसफ आहेत या गांवचे" असें उत्तर दिलें. रामभटही ह्मणाला; "होय. रावसाहेब रावसाहेब घरीं सांगत असें ते हेच माझे यजमान." हे ऐकून वेणूबाई सानंदित

होत्साती गोपाळरावाच्या हनुवटीस हात लावून ह्मणाली "कोण रावसाहेब? हा गोपाळ सोना माझा राव-साहेब का झाला आहे येथें!!" असें ह्मणून मुख कुर-वाळून त्याचा मुका घेतला. हें पाहून रामभटाच्या बापास आपल्या बहीणीचा फार राग येऊन तो तिला दरडावून ह्मणाला; "हें नाहीं तेंच काय भकतेस? चळ तर नाहीं झाला तुला? चल हो पलिकडे. कोणी काकुळतीनें "मी तुझा आहें" असें ह्मटलें ह्मणून, त्यास "माझा सोना" हें तुझें बोलणें शोभतें काय अशा थोरांस?

**गो०**—नाही, मी केवळ काकुळतिनेंच ह्मणतों असें नाहीं. मी खराच हिचा बाळ आहें—थोर नाहीं. ज्यास समुद्रांत बुडून मेला असें समजलां तो मी हिचा बाळ—गोपाळा. मेलों नाहीं—तुह्मां वडिलांच्या आशिर्वादानें वाढलों आहें. जसे तुह्मी मज विषयीं निराश झालां होता, तसाच मीही आई मेली असें समजून राहिलों होतों; त्या ह्या दैवानें आज गाठी पाहिल्या!!

हें गोपाळरावाचें भाषण ऐकून सर्व आश्चर्य चकित् होऊन एकमेकाकडे पाहूं लागले; मग रामभटाच्या बापानें वेणूबाईस विचारिलें; "खरेंच का! पूर्ण ओळखिलेंस ह्यांला? काहीं खानाखुणा मिळतात काय बाळपणीच्या?

**वेणूबाई.**—होय. तो पहा याच्या उजव्या गाळावरचा तीळ ढळढळीत दिसत आहे तो. तो पाहून घरांतून कांहीं भाकीतही केलें होतें असें आठवतें मला. गोपाळा, अरे तुझ्या गुढग्या खालीं विस्तवानें भाजल्याचा व्रण होता तो आहे कायरे अजून? हें ऐकून गोपाळरावानें आपल्या धोतराचा शेव वर करून तो व्रण आईस दाखविला. तेव्हां सर्वजण विस्मित होत्साते गोपाळरावाच्या सभोंवते मिळाले आणि तो कसा वाचला व अशा स्थितींत कोणत्या रीतीनें आला व आज आईचा पत्ता कसा लागला हें त्यास विचारूं लागले, गोपाळरावानें सविस्तर आपली गतकथा त्यास सांगण्यास आरंभ केला.

**गो०**—समुद्रांतील प्रसंगाच्या वेळीं आईनें मला वट्ट पोटाशीं धरून आगबोटींत सैरा वैरा धांवत असतां, कोणीसा तिला आगभोटी खालीं ओढूं लागला; तेव्हां माझ्या पाठीचे तिचे हात सुटून मी तिच्या गळ्यांत लटकूं लागलों; आतां ती आगबोटीखालीं पडणार, इतक्यांत झडदिशीं मला कोणी तिच्या गळ्यापासून ओढून आगबोटींत सोडिलें आणि आई खालीं पडली. मला सोडून आईनें समुद्रांत उडी घेतली असें जाणून मी उभ्याधाय रडूं लागलों; तेव्हां तेथें कोणी एक सभ्य गृहस्थ होता

ग्रंथालय

त्यानें मला ओढून आपल्या पोटाशीं धरिलें आणि आग-
बोटीच्या दुसऱ्या बाजूस मचवा उभा होता त्यांत चड-
दिशीं उडी मारिली. नंतर नावाड्यांस बरेंच द्रव्य दे-
ण्याची आशा दाखवून त्यांस तेथून लवकर मचवा काढ-
ण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्या नावाड्यांनीं तो मचवा
काढून मोठ्या वेगानें जवळच्या बंदरास आणून लाविला.
तेथून मुंबईस जाणारी आगबोटीवर चढून तो गृहस्थ मला
घेऊन परत मुंबईस आला. मग त्यानें "माझें कोण आहे"
ह्मणून मला विचारिलें तेव्हां, "माझी आई बुडाली, बाप
वारला, मला आतां कोणी नाहीं, माझें नांव गोपाळ व
बापास भिकाजी ह्मणत" असें मी सांगितलें. तें ऐकून त्यानें
"आपल्या घरीं तूं खुशाल रहा" असें सांगून मला
पुष्कळ समजिच्या गोष्टी सांगितल्या. आणि मला ठेवून
घेतलें. तो गृहस्थ मोठा रोजगारी असून कुटुंब वत्सल
आहे. त्याला माझ्या बरोबरीचा एक व दुसरा मजपेक्षां
तीन वर्षांनें लहान असे दोघे मुलगे असून जेव्हां मी
त्यांच्या येथें गेलों तेव्हां दोन महिन्याची एक मुलगी
त्यां जवळ होती. त्यांचें कुटुंबही फार सज्जन माऊली
आहे. जें जें ह्मणून आपल्या मुलांस द्यावें व करावें तेंतें
आदिं मला. पुढें माझी मूंजी करून आपल्या मुलां-
बरोबर विद्याभ्यासास लाविलें. विद्येंत माझ्या बुद्धीचें

चापल्य पाहून तीं उभयतां मला फारच चाहूं लागलीं. पुढें मजकडून बराच अभ्यास करविल्यावर आपल्या आवडत्या मुली बरोबर माझें लग्न करून दिलें. आणि आज चार वर्षां पूर्वीं त्यानींच वगवसीला पोचवून ह्या राजधानींत मुनसफाच्या जागीं माझीं नेमणूक करविली आहे. पण सांगण्यास दुःख वाटतें कीं, वीस महिन्या-पूर्वीं माझी सौभाग्यवती मुंबईस असतां एकाएकीं तापानें मरण पावली, तरी माझा स्वसूर मला फार चहातो, व दुसरें लग्न करून देण्याविषयीं वरचेवर पत्रें लिहित आहे पण मींच कांहीं मनोविकारामुळें मागें टाकिलें आहे. असो. आई मेली अशी माझी पूर्ण खात्री झाली होती ह्मणून मी कधीं तिच्या तपासांत लागलों नाहीं; व राम-भाऊ जरी मजजवळ चार वर्षें आहे तरी त्यास परस्प-रांचा संबंध माहित नसल्यामुळें तोही मजजवळ कधींच अशी मुद्देसूद गोष्ट इच्या विषयीं बोलला नाहीं; व ज्या आडनावा वरून पत्ता लागला तें नांव मला मुळीं ठाऊक नव्हतें; आज जेव्हां सरकार स्वारीनें सहज रीत्या हीची सविस्तर मूळ कथा मला सांगितली तेव्हां त्यांत मुद्देसूद कांहीं खुना मुद्रा मला पटल्या सारिख्या होऊन गहींवर आला; तरी आपली पक्की खात्री करून घेतल्या शिवाय तद्विषयीं मी कोणाएका जवळ ब्रह सुद्धां न बोलतां थेट

येथें आलों आणि आईचा तोंडवळा ओळखून तिच्या गळ्यास मिठी मारिली.

**वेणूबाई.**—खरेंच कायरे गोपाळा, मला तूं पाहिल्या बरोबर ओळखिलेंस? जबराबुवा तूं! लहानपणीच्या आठवणी जेथच्या तेथें सांगतोस!!

**गोपाळराव.**—आगबोटींतील बहुतेक हकिगत माझ्या सासऱ्यानें मला मोठेपणीं सांगितली त्यावरूनच मी हीं तुह्मास सांगतों. मुख्य मुद्दा तो हा. (जाणव्याचा ताईत आईस दाखवितो) हाच नाग बाळपणचा आई माझ्या गळ्यांतला ताईत? यांत हिरा आहे ह्मणतेस?

**वेणूबाई.**—(गोपाळरावास वेंटाळून) बेटा, हिरा तूंच माझा! माझ्या गळ्यांतला तूं ताईत! मज मरतिचा जीव तूं! तूं मज गरीबाची शोभा! तुझ्या लाभानें सर्व जग जिंकलें, आणि देवलोकाचीही पायरी खुली झाली मला! आतां दगडी हिऱ्याची काय पर्वा!

हें इकडे इतकें होत आहे तों राजास ही बातमी लागून त्यानें त्या सर्वांस बोलावून नेलें. आणि भर दरबारांत गोपाळरावापासून सविस्तर मूळ हकिगत ऐकून घेतली. गोपाळरावानें आपल्या जाणव्याचा ताईत काढून जेव्हां राजाला दाखविला तेव्हां, " त्यांतील हिरा आपण

कोणत्या प्रसंगीं काढला ?" असें गोपाळरावास राजानें विचारिलें.

गो०—यांत हिरा आहे हें मी आजच ऐकिलें, या पूर्वी मला हिऱ्याविषयीं मुळींच माहिती नव्हतें. हा ताईत, आईबापांच्या हातचें हें माझें बाळ लेणें जाणून, यास एक क्षण सुद्धां न विसंवितां आईची माझी ताटातूट झाल्या दिवसापासून तों ह्या वेळ पर्यंत, मोठ्या प्रीतीनें नित्य स्वतः जवळच वागवित आहें. तेव्हां यांतला हिरा यांतच असण्याचा संभव आहे; कारण तो मी काढला नाहीं व हा ताईतही कोणा परक्याच्या हातीं दिला नाहीं." हें ऐकून रामभट पुढें होऊन ह्मणाला; "खरेंच, रावसाहेब हा ताईत नेहेमी जाणव्यास लावून ठेवितात. एक वेळ मात्र त्याचा फांसा झिजून तुटला होता तो बसवून आणण्या करितां माझे जवळ मात्र दिला होता." हें ऐकून तो ताईत आणून त्याची तोंडें डाकानें घट्ट बसविलेलीं होतीं तीं उघडून आंत पहातात तों, सोनारलोक डाका करितां तयार करितात अशा सोन्याचा गोळा होता तो बाहेर पडला; हें पाहून राजास मोठे आश्चर्य वाटलें. नंतर रामभटास राजानें विचारलें. "याचा फांसा कोणा जवळून नीट करविला ?

**रामभट.**—त्या जोतिबाशेट कडून, तोच आमचे घरचीं कामें करीत असे.

**राजा.**—अहँ! तो त्यानें लागलाच तुमच्या स्वाधीन परत दिला काय?

**रामभट.**—छे! कधीं गेलें तरी तों लागलेंच काम करून देत नसे ही त्याची खोडीच. त्यानें तो ठेवून घेतला आणि, "परवां ये" असें सांगितलें; शेवटीं आठ दिवसानीं हातीं आला. मी एके दिवशीं त्याची बरी पूजा केली तेव्हां दुसऱ्या दिवशीं जातांच तयार करून ठेविला होता तो आणून दिला. तसाच मी आणून रावसाहेबांच्या स्वाधीन केला त्याहीं पुनः जाणव्यास बांधला.

**गोपाळराव.**—होय होय. ही मला आठवण नव्हती. फांसा मोडला होता खरा, आणि तो याजवळ बसविण्याकरितां दिला होता. आतां हा रामभाऊ सांगतो त्यावरून त्या सोनाराचेंच कांहीं तरी यांत कृत्रीम असावें असें मला खास वाटतें. ह्याचा खुलासा काढणें तो काढणार खावंद समर्थ आहेत.

**राजा.**—खुलासा काढण्यास वेळ कशाला? त्याचेंच कृत्रीम आहे यांत तिळप्राय संशय नाहीं. कोण आहे रे, घेऊन या त्या सोनारास." अशी राजाची आज्ञा होतांच सेवक जोतिबास आणण्या करितां धांवले.

मागें रामभटानें जेव्हां आपल्या यजमानाचा ताईत नीट करावयास नेला होता तेव्हां तो नीट करीत असतां त्यांत जोतिबास हिरा दिसला; मग त्यानें तो चटदिशी बाहेर काढून आपल्या पेटींत उतरला आणि त्या ऐवजी हीणकस सोन्याचा गोळा त्या ताइतांत त्यानें भरून ठेविला होता. जेव्हां रामभट तो मागावयास गेला होता तेव्हां शेटजींनें आपल्या कसबीपणाची चुटमुट बतावणी करीत मोठ्या लगबगीनें तो आणून त्याच्या स्वाधीन केला. रामभटानें तो आणून परत आपल्या यजमानास दिला होता; त्यांत हिरा होता हें त्या तायताच्या मालकासही माहित नव्हते मग भटास कोठून असणार! पुढें त्याची चौकशी लागेल अशा भयानें बरेच दिवस जोतिबानें तो छपून ठेविला होता; नंतर बाहेर नेऊन विकला. आतां जेव्हां स्वतः राजा त्या हिऱ्याची चौकशी करूं लागला तेव्हां जोतिबा प्रथम बराच गडबडला. पण तो एका जोशास दिला होता वगैरे जेव्हां राजा बोलला तेव्हां त्यास थोडा धीर येऊन, त्याचा पत्ताच राजा विचारितो ह्मणून सट्दिशीं त्यानें रामभटाचेंच नांव सांगून दिलें. ताईताचें नांव मुळींच काढलें नाहीं कारण तसें सांगितल्यास त्यांत तो सामील होता असें होईल व जर करितां पुढें मागें ताईताचा मुद्दा निघालाच तर

त्यापासून त्यास साफ सुटतां यावें अशा विचारानें तो त्यानें आपणास पंधराशास विकला असेंच राजास सांगितलें. आतां जेव्हां राजानें जोतिबास बोलावून बारीक रीतीनें चौकशी केली तेव्हां ही त्याची सर्व लुच्चेशाई उघडकीस येऊन तो खालीं मान घालून चूप राहिला. तेव्हां राजानें त्याची भर दरबारांत फटूफजिती करून त्यास कैद केलें. नंतर त्याच्या जवळून १०००० रुपये घेऊन हिरा आणणाऱ्या सौदागरास पाठविले. व पुढें त्याच्या जवळून बरीच रकम दंडा दाखल घेऊन त्याला शहरा बाहेर हांकून लाविलें. त्यानें आणलेल्या साक्षांसही थोडें बहूत शासन केलें. नंतर रामभटास पुढें बोलवून भरदरबारांत राजानें त्याची सत्यनिष्टता वाखाणिली व मोठ्या सत्कारानें त्यास थोर कामदारांच्या जवळ बसविलें व ह्मणाला. "पुढें हा असल्या थोर हुद्याच्या अधीकारानें आपल्या मंडळांत बसेल अशा सद्गुणाची ईश्वरानें याच्या ठायीं योजना केलेली आहे. व हें घडवून आणण्यास मदत करणें माझें कर्तव्य आहे." नंतर राजानें आपल्या एका कोकणस्थ कामदारास आपली उपवर मुलगी रामभटास द्यावयाची सूचना करून लग्न सोहळा आपण आपल्या खर्चानें मोठ्या थाटाचा करणार असें सांगितलें. नंतर राजानें गोपाळरावास आपल्या

सासऱ्यास पत्र लिहिण्यास सांगून दरबार बरखास्त केला. सर्व आपआपल्या ठिकाणीं गेले.

गोपाळरावाचा सासरा इंदुरास आल्यावर एके दिवशीं गोपाळरावास बरोबर घेऊन राजाच्या भेटीस गेला तेव्हां राजानें त्याचें आदर आतिथ्य केल्यावर आगबोटींतील हकिगत त्यास विचारिली. तो ह्मणाला; "महाराज, मी सडाच कांहीं निमित्यानें रत्नागिरीस जाण्याच्या इराद्यानें ज्या बोटींत बसलों होतों त्यांतच कांहीं अंतरावर हीं उभयतां मायलेंकरें बसलेलीं होतीं. कांहीं वेळानें यांच्या बरोबर असणारा संगाती माझे जवळ पंचपात्रीभर पाणी मागावयास आला तेव्हां "ही बाई आपली कोण व तो मुलगा कोणाचा" ह्मणून मी त्यास विचारलें; तेव्हां तो ह्मणाला; "ही बाई भिकाजी जोशाचें कुटुंब व तिचाच हा मुलगा; मागें कोणी नाहीं ह्मणून आतां कोकणास निघाली आहे; मागाहून येतों" इतकें ह्मणून मोठ्या लगबगीनें पाणी घेऊन गेला. "भिकाजी जोशाचें कुटुंब" हे शब्द ऐकून मला फार वाईट वाटलें; कारण कांहीं वर्षां पूर्वीं मी पुण्यास होतों तेव्हां तेथें जोशीबुवांची माझी गांठ पडून चार सहा दिवस परिचय झाला होता. त्या नंतर त्यां विषयीं कांहीं समाचार नसून हें आगांतुक कळलें. तो पाणी घेऊन जाणारा पुनः मजजवळ ये-

ण्याच्या आदींच आगबोटीवर घोर प्रसंग गुदरला. त्या प्रसंगांत त्या बाईच्या गळ्यांत बाळ लोंवत आहे, व ती बोटीच्या अगदीं कांठावर खालींवर पहात, मोठ्यानें आकांत करीत मनुष्याच्या धकाधकींत उभी आहे असें मी प्रत्यक्ष पाहिलें. पण काय तो प्रसंग! ज्याच्या तो आपल्या विचारांत! मी तरी बोटीच्या ह्या कडेपासून तो त्या कडे पर्यंत धांवून उतरण्याची सोय पहात होतों पण छाती होईना. बोटीस लागलेल्या मचव्यांत मनुष्यें धडाधड खालीं उड्या टाकूं लागलीं तेव्हां अतिशय भाराच्या योगानें एक दोन मचवे तर तळींच जाऊन बसले! कित्येक बुडत आहेत, कित्येक तरत आहेत, कित्येक मचवे बोटीस लागले आहेत, कित्येक चालत आहेत, अशा गडबडीनें मी गांगरून उतरण्याची धांवाधांव करित असतां, हा बाळ उभ्या धांय रडत बोटींत धांवत आहे असें मीं पाहिलें; तेव्हां लागलीच यांस उचलून सामानाची पर्वा न करितां बोटीच्या पलिकडील बाजूस मचवा लागला होता त्यांत चट्दिशीं उडी टाकीली; तो परत जैगडच्या बंदरांत उतरलों. तेथून दुसरे दिवशीं आगबोटीवर चढून यांला घेऊन परत मुंबईस आलों. यांहीं आपली आई समुद्रांत पडून बुडाली असें सांगितलें; आणि मी पाहिलें होतें त्याकरून मलाही वाटलें कीं तळीं गेलेल्या मचव्यांत

बाई व तिचा सांगाती खास बुडाली. मग मी त्यांच्या शोधाच्या भरीस पडलोंच नाहीं. पुढें मला जशी ईश्वरानें बुद्धी देऊन यांचें संगोपान करविवलें तसें मी यथा-शक्ति करून शेवटीं आपल्या चरण सेवेंत यांस आणून गुंतविलें आहे; पुढें आपण त्यांचे संरक्षण करणार समर्थ अहां. आणि आज आपल्याच दीर्घ प्रयत्नानें ही आई पुत्राची अचिंत भेट होऊन सर्वत्र आनंदच आनंद झाला आहे; असाच चिरकाळ या राज्यांत आनंद आसावा हें ईश्वरापाशीं मागणें आहे." हें ऐकून राजास त्याच्या संभावित पणाचा फारच आचंबा वाटला व त्याचा मोठा इतमाम राखिला. पुढें एक दोन दिवसांनीं रामभटाच्या लग्नसोहळ्यास सुरुवात झाली. राजा ज्या कार्याचा मुख्य कारभारी त्या कार्याची मग काय शोभा पहावयाची आहे! वाजंत्री काय, जेवणावळी काय, अहेर काय, डागडागीणा काय, भरजरी वस्त्रें किती सुवाशिक द्रव्यें किती, आणि पुष्पांचे हारतुरे किती!! नळे चंद्रजोती किती, बंदुकांचे बार किती, आणि दीपोत्साह काय!! चार आठ दिवस एक सारखा उत्साह चाललेला होता. शेवटीं वधुवराच्या अंगावर जे मोठ मोठे डागीणें घातले होते ते व भरजरी पोषाख रामभटास बक्षीस दिला. गोपाळरावास शेला पागोटें देऊन तो

हिरा एका पदकांत जडून त्यांच्या गळ्यांत घातला. गोपाळरावाच्या सासऱ्यास एक उंच्या हिऱ्याची आंगटी, मोत्याचा हार व शालजोडी देऊन त्यांची संभावना केली. तसेंच, रामभटाच्या बापास, वेणुबाईस, गोपाळरावाच्या सासूस व इतरांस थोडें बहूत अहेर करून त्यांस आनंद भरीत केलें. रामभटास राजानें आपल्या पदरीं ठेऊन त्याचे वडीलास सहकुटुंब इंदुरासच राहून घेतलें. पुढें रामभट बराच योग्यतेस चढला. रामभटाचा बाप मनांत ओशाळा होऊन आपणाशींच ह्मणतो "गरीब स्थितींत लाभाची झुळूक दिसून तें साधत नाहीं असें जेव्हां होतें तेव्हां संतापानें मनुष्य किती बरें वेडा होतो. राजा समक्ष त्या वेणूस किती मी शकून बोललों बरें. अशा वेळीं शांति असणें योग्य आहे. तीणें आवकाश काढिला ह्मणून हा दिवस दिसला. लबाडलोकांनीं आपल्यावरील प्रसंग टाळण्याकरितां किती जरी कोणावर प्रसंग आणिले तरी शेवटीं लबाडी उघडकीस येऊन त्यांच्या कपाळीची फट्फजती, दुःख व दैन्यावस्था हीं कधीं त्यांस चुकत नाहींत. हें पक्कें लक्षांत वागवावें."

आतां या गोष्टींत गोपाळरावानें आपल्या गळ्यांतील ताईत जपून ठेविला होता ह्मणून त्याची व आईची भेट झाली हें खरें, तरी ताईतांतल्या हिऱ्या पेक्षां रामभटानें

जो सत्याच्या हिऱ्याचा ताईत आपल्या हृदई घट्ट धरिला होता त्याच्या प्रकाशानें हें सर्व प्रकरण उजेडास आलें असें होतें. खरा जो आहे तो किती जरी संकटांत पडला तरी असत्याचा अंगिकार कधींच त्यापासून व्हावयाचा नाहीं. पहा, रामभट किती संकटांत पडला होता तो! त्यास राजानें भय दाखविलें, द्रव्यलोभ दाखविला, बंदीखान्यांत घातलें, शेवटीं मतलबानें फसविण्या करितां "तुझे आतेस हिरा नेऊन दे" असें बोलला ; ह्मणून हा जरा तरी सत्यास ढळला काय! धन्य याची सत्यनिष्टता!! हा जर लोभानें किंवा भयाने खोटें बोलता तर आज जो याच्या वृद्ध आतेस पुत्र लाभ झाला आहे आणि त्याच्या वडिलांस व त्यास जें अपरमित सौख्य प्राप्त झालें आहे त्यास तो सर्वस्वी मुकता. तेव्हां सौख्य हें सत्याचें फळ होय ; असें सर्वकाळ मनांत वागवून वर्तावें.

ही गोष्ट, प्रापंच व परमार्थ अभिलाषी आपल्या अनुभव शक्तीच्या बळानें ज्या रूपकास मिळवितील त्यास ते मिळवोत.

---